**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः01.10.2025** **वारःबुधवार**

---

१)दुष्काळी टंचाईच्या सर्व सवलती अतिवृष्टीग्रस्त प्रदेशाला लागू करण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय.

२)राज्याचा ऊस गाळप हंगाम १ नोव्हेंबरपासून सुरू होणार

३)राज्यभरात १८ रुग्णालयांमधे कर्करोगाशी निगडीत विशेषोपचार उपलब्ध होणार

आणि

४)आयसीसी महिला विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाची विजयी सलामी

**<u>मंत्री मंडळनिर्णय</u>**

Intro :ओला दुष्काळ जाहीर करण्याची कोणतीच तरतूद नियमात नसल्याने आजवर कधीच ओला दुष्काळ जाहीर झाला नाही. मात्र, दुष्काळी टंचाईच्या काळात ज्या सवलती आणि उपाययोजना केल्या

जातात त्या सर्व आता या अतिवृष्टीच्या काळात लागू करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत राज्यातल्या अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. ही सगळी मदत दिवाळीपूर्वी देण्याचा आपला प्रयत्न असल्याचं ते म्हणाले. आपत्ती ग्रस्त शेतकऱ्यांकडील कर्जाची वसूली थांबवावी असे निर्देश बँकांना दिल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

राज्यात आतापर्तंच्या अतिवृष्टीने ६० लाख हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. ऑगस्टपर्यंत झालेल्या नुकसानीपोटी २ हजार २१५ कोटींच्या निधी वितरणाला यापुर्वीच मान्यता देण्यात आली आहे. या मदतीसाठीची ईकेवायसीची अट शिथिल करून अँग्रीस्टॅकच्या आधारे निधी वितरण करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याने पुढील दोन-तीन दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीची ही रक्कम जमा होईल अशी माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

राज्याचा ऊस गाळप हंगाम १ नोव्हेंबरपासून सुरू होणार असल्याची माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्री समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यासह मुख्यमंत्री

सहायता निधीसाठी प्रतिटन १० रुपये कपात आणि पूरग्रस्तांच्या मदतीसाठी प्रतिटन ५ रुपये कपात करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. यंदा गाळप होणाऱ्या ऊसासाठी प्रति मेट्रीक टन ३ हजार ५५० रुपये एफआरपी तर बेसिक उताऱ्यासाठी १० पूर्णांक २५ टक्के देण्यात येणार आहे.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी कृषीविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी १ दिवसाचं वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये मदत देणार आहेत. यातून ६ कोटी रुपयांहून अधिक निधी जमा होईल, असं ते म्हणाले.

शहरी आणि ग्रामीण भागात सर्वसमावेशक विकास करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि प्रशासकीय गतीमानतेवर भर देणारे महाराष्ट्र जागतिक क्षमता केंद्र धोरण २०२५ या  बैठकीत मंजूर करण्यात आले.

तसच राज्याच्या विकासाला आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जोड देऊन एकात्मिक आणि नियोजनबद्ध गती देण्यासाठी महाजिओटेक महांडळ स्थापन करण्यास आणी सातारा जिल्ह्यातील फलटण येथे

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर स्थापन करण्यास या बैठकीत  मान्यता देण्यात आली.

हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाला हाफकिन खरेदी कक्षाच्या दोन टक्के उपकरातून २५ कोटी रुपयांचा निधी देण्यास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली.

राज्य सरकार कर्करोग उपचारासाठी सर्वसमावेशक धोरण आखून प्रत्येक जिल्ह्यात कर्करोगावर दर्जेदार उपचार उपलब्ध करुन देणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत याबाबत निर्णय झाला. राज्यभरात १८ रुग्णालयांमधे कर्करोगाशी निगडीत विशेषोपचार उपलब्ध होतील. यासाठी १०० कोटी रुपये भाग भांडवलाची महाकेअर, अर्थात महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन ही कंपनी स्थापन केली जाणार आहे.

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणेकेंद्रावरून ऐकत आहात

Intro :सेवा आणि सुशासन, हा मंत्र समोर ठेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार देशात परिवर्तन आणि प्रगती घडवून

आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. सेवा पर्व या विशेष मालिकेत आज ऐकुया भारताच्या जी २० मधील यशाबद्दल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताला एक प्रबळ नेतृत्व असलेला देश म्हणून जगाच्या नकाशावर स्थान मिळालं आहे. भारतानं वर्ष २०२३ च्या, जी २० परिषदेचं अध्यक्षपद भूषवल्यामुळे जागतिक पटलावर दक्षिणेकडील देशांची भूमिका मांडता आली आणि त्याचे ठोस परिणामही दिसून आले. आफ्रिकन युनियनला जी २० गटात सहभागी करून घेणे आणि जैवइंधनासाठी जागतिक स्तरावर भागीदारी, हे यातील महत्त्वाचे मुद्दे आहेत. भारतात झालेल्या जी २० परिषदेचं "वसुधैव कुटुंबकम" हे घोषवाक्य देशाची समृद्ध संस्कृती, नीतीमत्ता आणि जागतिक सहकार्याची इच्छा अधोरेखित करतं.

याबाबत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणतात.......

भारतातील जी 20च्या बैठकांच्या माध्यमातून ग्लोबल साउथचा आवाज तर बळकट झालाच, त्याचबरोबर देशभरात ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी या बैठका आयोजित करून भारतानं आपला सांस्कृतिक वारसाही जगासमोर आणला .

**<u>विविधउत्सव</u>**

शारदीय नवरात्रोत्सवाची उद्या सांगता होणार आहे. काल महाअष्टमीसाठी अनेक मंदिरात महिलावर्गाची रिघ लागली होती. श्री तुळजाभवानी देवीची महिषासुरमर्दिनी अलंकार महापूजा काल अत्यंत भक्तिभावाने संपन्न झाली.अष्टमीच्या दिवशी महागौरीच्या पूजेसह कन्यापूजनाचं महत्व आहे.

उद्या साजऱ्या होणाऱ्या  विजयादशमीच्या म्हणजे दसऱ्याच्या सणाचा उत्साह सर्वत्र बघायला मिळत आहे. साडेतीन मुहुर्तांपैकी एक असा हा सण संपूर्ण देशभरात साजरा करण्यात येतो.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर रोजी ‘जागतिक अहिंसा दिन’ म्हणून साजरी केली जाते. त्यानिमित्त महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दल यांच्या संयुक्त विद्यमाने आजपासून ८ ऑक्टोबर पर्यन्त गांधी भवन, कोथरूड येथे आठ दिवसांचा ‘गांधी सप्ताह’ आयोजित करण्यात आला आहे. या अंतर्गत नामवंतांची व्याख्याने, मुलाखती असे अनेक कार्यक्रम होणार आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शताब्दी समारंभही उद्या नागपूरच्या मुख्यालयात होणार आहे. नवी दिल्ली इथे होणाऱ्या कार्यक्रमात

पंतप्रधानांच्या हस्ते एका टपाल तिकीटाचं आणि नाण्याचं प्रकाशन होणार आहे.

69व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनही उद्या नागपूरमध्ये साजरा होत आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भारतरत्न डॉ बाबासाहेबआंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी लाखों अनुयायी नागपूरमध्ये येतात.

**<u>बोधचिन्ह</u>**

मुख्यमंत्रीदेवेंद्रफडणवीसयांच्याहस्ते काल मंत्रालयात'वंदेमातरम' गीताच्याबोधचिन्हाचं अनावरणकरण्यातआलं. देशभक्तीआणिराष्ट्रीयअस्मितेचंप्रतीकअसलेल्या'वंदेमातरम' गीताला येत्या ७नोव्हेंबरलादीडशे वर्षपूर्णहोतआहेत. यानिमित्त राज्यभरातदेशभक्तीपर विविधकार्यक्रमहोणारअसूनयातप्रामुख्यानं 'वंदेमातरम' गीताचं प्रत्येकतालुक्यातसमूहगानहोणारआहे.

**<u>किल्लारीभूकंप</u>**

लातूर जिल्ह्यातील किल्लारी इथं ३० सप्टेंबर १९९३ रोजी झालेल्या भूकंपाला काल आज 32 वर्षे पूर्ण झाली. या भूकंपात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना जिल्हा प्रशासनाच्यावतीने श्रद्धांजली वाहण्यात आलीतर पोलीस दलामार्फत हवेत बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना देण्यात आली.

**<u>महिला क्रिकेट</u>**

आयसीसी महिला विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत, काल गुवाहाटी इथं झालेल्या सलामीच्या सामन्यात ,भारतीय संघानं श्रीलंकेवर ५९ धावांनी विजय मिळवला. पहिल्यांदा फलंदाजी स्वीकारून ४७ षटकात भारतानं श्रीलंकेसमोर 270 धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र उत्तरादाखल श्रीलंकेचा संघ ४५ षटकं आणि २ चेंडूत २११ धावांवर बाद झाला. पावसामुळे हा सामना ४७ षटकांचा करण्यात आला.

**<u>हवामान</u>**

पावसाचा जोर आता ओसरत असून उद्या कोकणात बहुतांश ठिकाणी तर इतर विभागात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामानविभागानं व्यक्त केली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**